RCS 42/2026
Exh. 5

-1-

रे. क. नं.        /2026.

# मे. दिवाणी न्यायाधीशसाो, क. स्तर, कागल

यांचे कोर्टात............

| | | |
|---|---|---|
| श्री. रत्नाकर दौलू लोहार<br>व.व. 80 धंदा – पेन्शनर<br>रा. निढोरी ता. कागल जि. कोल्हापूर | } | वादी |

विरूध्द

| | | |
|---|---|---|
| 1. श्री. संजय बाजीराव लोहार<br>व.व. 48 धंदा – शेती<br>2. श्री. संपत बाजीराव लोहार<br>व.व. 45 धंदा – शेती<br>रा.दोघेही निढोरी ता. कागल जि. कोल्हापूर | } | प्र.वादी |

सि. पी. सी. ऑ. 39 रूल 1 व 2 प्रमाणे व

कलम 151 प्रमाणे तुर्तातुर्त मनाई अर्ज

<u>यातील वादी मे.कोर्टास नम्रपणे कळवितात की,</u>

यातील प्रतिवादी हे दावा मिळकतीमध्ये अतिकमण करून बेकायदेशिपणे बांधकाम करणेचा प्रयत्न करीत आहेत त्यामुळे वादी यांनी प्रतिवादी यांचे विरूध्द कायम मनाईचा दावा दाखल केलेला आहे. सदरचे दावेस खुपच दिनावधी लागणेची शक्यता आहे. सदर कालावधीमध्ये यातील प्रतिवादी बेकायदेशिरपणे अतिकमण करून

Undale 13/3/2026
Assistant Superintendent

बांधकाम पुर्ण करणेची शक्यता असलेने वादीस प्रतिवादी नं. 1 व 2 यांचे विरूध्द सदरचा तुर्तातुर्त मनाईचा अर्ज दाखल करणे भाग पडत आहे त्यासी कारणे पुढीलप्रमाणे –

1. दावा मिळकतीचे वर्णन :–

मौ. निढोरी ता. कागल जि. कोल्हापूर येथील,

सि. स. नं. 183 क्षेत्र 12.00 चौ. मी. ची बोळ मिळकत यासी चतु:सिमा – पुर्वेस – वादी यांची सि. स. नं. 178 ची मिळकत,

पश्चिमेस – प्रतिवादी यांची सि. स. नं. 182 ची मिळकत,

दक्षिणेस – रस्ता

उत्तरेस – प्रतिवादी यांची सि. स. नं. 182 ची मिळकत,

येणेप्रमाणे वर्णनाची मिळकत सदर दावेचा विषय असून येथून पुढे सदर मिळकतीस दावा मिळकत असे संबोधणेत येत आहे.

2. दावा मिळकत यातील वादी व प्रतिवादी यांचे वडील कै. बाजीराव हरी लोहार यांचे प्रत्यक्ष मालकी व सामाईक कब्जा वहिवाटीची मिळकत आहे. दावा मिळकतीचे प्रॉपर्टीकार्ड पत्रकी यातील वादी व प्रतिवादी यांचे वडील कै. बाजीराव हरी लोहार यांचे नावच्या नोंदी मालक सदरी झालेल्या आहेत. दावा मिळकत वादी हे मालक नात्याने सन 1983 पासून सामाईकात कब्जेवहिवाटीत आहेत. दावा मिळकतीचे चौकशी रजि. पत्रकी दि. 15/12/1983 पासून वडीलार्जित व सामाईकपणे नोंद झालेली आहे. दावा मिळकतीशी यातील प्र.वादी यांचा एकटयाचा कसलाही हक्क अगर हितसंबंध नाही.

3. दावा मिळकतीमध्ये यातील वादी हे दक्षिणेकडील रस्त्यावरून ये – जा करीत असतात. तसेच सदर मिळकतीचा ग्रा.पं. फाळा यातील वादी भरत आलेले आहेत. सध्या प्रतिवादी यांचे वडील कै. बाजीराव हरी मयत असून अदयाप मयत बाजीराव

Assistant Superintendent

हरी लोहार यांचे नावाच्या नोदी प्रॉपर्टी कार्ड पत्रकी वादी यांचे नावासह सामाईकात झालेल्या आहेत. वादी व प्रतिवादी सदरची मिळकत बोळ म्हणूनच सामाईकात वापरत आहेत. वादी यांनी सि. स. नं. 178 सह दावा मिळकतीची दि. 28/04/2014 इ. रोजी नियमित मोजणी घेतलेली आहे.

4. वरील प्रमाणे परिस्थिती असताना यातील प्रतिवादी यांनी दि. 10/02/2026 इ. रोजी दावा मिळकतीमध्ये अनाधिकराने व बेकायदेशिरपणे, ग्रा. पं. ची परवानगी न घेता अतिकमण करणेचे हेतूने बांधकाम करणेसाठी पाया खुदाई करणेस सुरूवात करू लागले. सदर बांधकामास यातील वादी यांनी गावातील प्रतिष्ठित लोक व पंचासमक्ष हरकत व तकार केली असता यातील प्रतिवादी यांनी दावा मिळकतीमध्ये बांधकाम करणार नसलेचे सांगून सि. स नं. 182 मध्ये हददी नुसार बांधकाम करणार असलेचे सांगितले. त्यामुळे वादी यांनी प्रतिवादी यांना सि. स. नं. 182 मध्ये बांधकाम करणेस हरकत नसलेचे सांगितले. सध्या प्रतिवादी यांनी स्लॅबपर्यतचे बांधकाम पुर्ण केलेले आहे व दिनांक 10/03/2026 इ. रोजी यातील प्रतिवादी यांनी अचानक पणे दावा मिळकतीमध्ये स्लॅबमधून दावा मिळकतीमध्ये अतिकमण करून बेकायदेशिर वाढीव बांधकाम करणेचे हेतूने सेंट्रींगचे लोखंडी पोल उभे करून वादी यांचे पुर्वेकडील सि. स. नं. 178 च्या भिंतीपर्यत सेंट्रींगच्या पटटया व बिंबाचे काम सुरू केले आहे. यातील प्रतिवादी यांनी दावा मिळकत बोळ अंदाजे पुर्व पश्चिम 3.5 फुट रूंद व दक्षिण – उत्तर 30 फुट लांबीचे दावा मिळकतीमध्ये बेकायदेशिर व वाढीव स्लॅबचे काम करणेस सुरूवात केलेली आहे. प्रतिवादी यांचे सदरचे कृत्य बेकायदेशिर व वादी यांचे न्याय हक्कावर गदा आणणारे आहे. दावा मिळकत वादी व प्रतिवादी यांचे सामाईक मालकी व सामाईक कब्जे वहिवाटीची मिळकत आहे. असे असताना निव्वळ वादी यांचे हक्क व अधिकार डावलण्याचे हेतूने प्रतिवादी अनाधिकाराने, बेकायदेशिपपणे व गुंडगिरीच्या जोरावर वाढीव बांधकाम करणेचा प्रयत्न करीत आहे. वादी यांनी प्रतिवादी यांना व मजूर लोकांनाही समजावून सांगणेचा प्रयत्न करित असता यातील प्रतिवादी नं. 1 यांनी वादीस अर्वाच्य शिवीगाळी करून "तुझा या मिळकतींशी काहीही संबंध नाही" "दावा मिळकत माझ्या मालकीची आहे, तुमचा सदर मिळकतीशी कोणताही हक्क व अधिकार नाही " असे म्हणून दावा मिळतीमधील वादी

Assistant Superintendent

यांचे मालकी हक्क नाकारून सामाईक कब्जे वहिवाटीस हरकत व अडथळा निर्माण करून वादीचे असले प्रत्यक्ष मालकी व सामाईक शांततामय कब्जे वहिवाटीस हरकत व अडथळा करून वादीस दावा मिळकतीमधून हुसकावून लावणेचा प्रयत्न केलेला आहे.

5. वादी यांनी स्वतः व गावातील कांही प्रतिष्ठीत नागरीकांनी प्रतिवादी यांना समजावून सांगणेचा प्रयत्न केला परंतू प्र.वादी हे कांहीही ऐकण्याचे तयारीत नाहीत. म्हणून यातील वादी यांनी प्रतिवादी यांना दि. 11/03/2026 इ. रोजी ॲड. सुधीर एम. सावर्डेकर यांचे मार्फत रितसर कायदेशिर नोटीस पाठविली तरीही यातील प्रतिवादी कांही राजकीय लोकांचे पाठींब्यावरून व गुंडगिरीच्या जोरावर दावा मिळकतीमध्ये  दावा मिळकतीमध्ये अतिकमण करून बेकायदेशिर बांधकाम करणेचा प्रयत्न करीत आहेत. सदरचे प्रतिवादी यांचे कृत्य बेकायदेशिर असून वादी यांचे न्याय हक्कावर गदा आणणारे आहे. त्यामुळे वादीस प्रतिवादीविरूद्ध सदरचा तुर्तातुर्त मनाईचा अर्ज दाखल करणे भाग पडले आहे.

6. वादीस सदर कामी अंतिम यशाची खात्री आहे.

7. सकृत दर्शनी केस वादीचे बाजूने आहे.

9. न्यायाचा तराजू वादीचे बाजूने आहे.

10. वादी सदर कामी प्रतिवादी विरूध्द जशी तुर्तातुर्त मनाईची दाद मागतात तशी दाद दिली गेलेस यातील प्रतिवादी यांचे कांहीही नुकसान होणार नाही. याउलट याकामी वादी प्रतिवादी विरूध्द जशी तुर्तातुर्त मनाईची दाद मागतात तशी दाद न दिली गेलेस यातील प्रतिवादी हे वादी यांचे मालकी व सामाईक कब्जे वहिवाटीचे मिळकतीमध्ये बेकायदेशिर व अतिकमण करून घराचे बांधकाम पुर्ण करतील त्यामुळे यातील वादी यांचे कशानेही न भरून येणारे असे नुकसान होणार आहे.

11. सदर कामी वादीस कॅव्हेट नोटीस नाही.

Assistant Superintendent
Civil Court Jr. Dn.

12. सबब, वादी यांची मे.कोर्टाना विनंती की,

अ. वादीचा सदरचा अर्ज खर्चासह मंजूर करणेत यावा.

ब. यातील प्रतिवादी अगर तर्फे इसमानी दावा मिळकतीमध्ये कोणत्याही प्रकारचे बांधकाम करू नये तसेच वादी यांचे दावा मिळकतीमधील असले शांततापूर्ण मालकी व सामाईक कब्जेवहिवाटीस हरकत अगर अडथळा करू नये असा तुर्तातुर्त मनाई आदेश व्हावा हि नम्र विनंती.

क. इतर अनुषंगिक न्यायाचे हुकूम याच कामी वादीचे बाजूने व्हावेत.

...............येणेप्रमाणे तुर्तातुर्त मनाई अर्ज असे.

कागल.

तारीख 12 / 03 / 2026.

तयार करणार व दाखल करणार

( ॲड. सुधीर मा. सावर्डेकर )

## प्रतिज्ञा

मी श्री. रत्नाकर दौलू लोहार व.व. 80 धंदा – पेन्शनर रा. निढोरी ता. कागल जि. कोल्हापूर सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की वर नमूद अर्जातील संपूर्ण मजकूर माझे प्रत्यक्ष माहीती व समजूतीप्रमाणे खरा व बरोबर आहे म्हणून केली प्रतिज्ञा आज मु. कागल ता. 12 / 03 / 2026.

Assistant Superintendent
Civil Court Jr. Dn.,
Kagal

# ॲफिडेव्हिट

मी श्री. रत्नाकर दौलू लोहार व.व. 80 धंदा – पेन्शनर रा. निढोरी ता. कागल जि. कोल्हापूर देवाशपथ खरे सांगतो की वर नमूद अर्जातील संपूर्ण मजकूर माझे प्रत्यक्ष माहीती व समजूतीप्रमाणे खरा व बरोबर आहे म्हणून केले ॲफिडेव्हिट आज मु. कागल ता. 12/03/2026.

ॲफिडेव्हिट करणा–यास मी ओळखतो

( अॅड.सुधीर मा. सावर्डेकर )

# प्रतिज्ञा

मी श्री. रत्नाकर दौलू लोहार व.व. 80 धंदा – पेन्शनर रा. निढोरी ता. कागल जि. कोल्हापूर सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की वर नमूद अर्जातील व ॲफिडेव्हिटमधील संपूर्ण मजकूर माझे प्रत्यक्ष माहीती व समजूतीप्रमाणे खरा व बरोबर आहे म्हणून केली प्रतिज्ञा आज मु. कागल

ता. 12/03/2026.

Solemnly Affirmed before me by
Shri
Identified by Shri
whom I know personally
Dated 12/03/2026

Assistant Superintendent

MADKE AJIT BHISHMA

Digitally signed by MADKE AJIT BHISHMA
Date: 2026.03.16 17:21:19 +0530